www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६२ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१५ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## मोदींच्या गॅरंटीची परिस्थिती चायनीज मालासारखी

# ‘चले तो चांद तक, नही तो शाम तक’ -जयंत पाटील

**नाशिक (वृत्तसंस्था)-नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. यावेळी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली.**

मोदींच्या गॅरंटीची परिस्थिती चायनीज मालासारखी असून चले तो चांद तक, नही तो शाम तक अशा शब्दात जयंत पाटील यांनी सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला आहे.संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात सर्वात अस्वस्थ जर कोणी आहे तर तो शेतकरी. यापूर्वी देखील देशातला शेतकरी दिल्लीच्या दारात जाऊन बसला. ७०० पेक्षा जास्त शेतकरी मृत्यूमुखी पडले. पण दिल्लीचं सरकार हललं नाही. आता पुन्हा एकदा आमचा शेतकरी बांधव शेतमालाला आधारभूत किंमत मिळावी म्हणून लढतो आहे. इतर कसली नको आधारभूत किंमत मिळण्याची गॅरंटी आम्हाला द्या, असेही जयंत पाटील यांनी म्हटले आहे. कांद्याचे भाव पडले आहेत. निर्यात बंदी उठवण्याची दानत या सरकारची नाही. केळी, संत्री बांगलादेश मध्ये निर्यात करता येत नाही. द्राक्षाची काही वेगळी अवस्था नाही. सोयाबीनचे दर पडलेले आहेत. सत्तेवर येण्याआधी जे कापसाला दहा हजार रुपये मागत होते, सोयाबीनला सहा हजार रुपये मागत होते ती लोकं आता काहीच बोलायला तयार नाही. देशभरातील शेतकऱ्यांनी आता संघटित व्हायला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.यांच्या गॅरंटीची परिस्थिती चायनीज मालासारखी आहे, चले तो चांद तक, नही तो शाम तक. जाहिरातींचा प्रचंड भडिमार सुरू आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी ज्यांनी भारतभर पदयात्रा काढली, आता न्याय यात्रेच्या माध्यमातून ते लोकांशी संवाद साधत आहेत. मात्र टिव्हीवर, मोबाईलवर ते कुठेच दिसणार नाही. कारण तुमच्या पर्यंत काय पोहचवायचं याचा निकाल झालेला आहे. जे सोयीचे आहे तेच तुमच्या डोळ्यांना दिसतं. त्यामुळे सत्य पुढे येतच नाही. घराघरात बेकारी, महागाई आहे, शेतीमालाच्या दराचा प्रश्न आहे. म्हणून सर्वसामान्य लोकांनी, शेतकऱ्यांनी जागरूक झाले पाहिजे. या सर्व प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी भविष्यकाळात तुम्ही लढाल असा विश्वास बाळगतो, अशी अपेक्षा देखील जयंत पाटील यांनी व्यक्त केली.



# निवडणुका जाहीर होण्यापूर्वी पेट्रोल-डिझेल २ रु.स्वस्त

## गॅसच्या दरकपातीनंतर आठच दिवसांत दुसरा निर्णय



**नवी दिल्ली-**लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता एक-दोन दिवसांत लागण्याची शक्यता असताना मोदी सरकारने पेट्रोल व डिझेलचे दर प्रत्येकी २ रुपयांनी स्वस्त करून सर्वांना दिलासा दिला आहे. शुक्रवारी सकाळपासूनच (१५ मार्च) नवे दर लागू होतील. ८ मार्च रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात १०० रुपये कपात करण्यात आली होती.
केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी सोशल मीडियावरून गुरुवारी रात्री हा निर्णय जाहीर केला. नव्या दरांनुसार, मुंबईत पेट्रोलचे दर १०६.३१ रुपयांवरून १०४.२० रुपयांपर्यंत कमी होतील, तर डिझेलचे दर ९४.२७ रुपयांवरून ९२.१५ रुपये प्रतिलिटर कमी होतील. यापूर्वी केंद्र सरकारने एप्रिल २०२२ मध्ये पेट्रोलवरील एक्साईज ड्युटी ८ रुपयांनी तर डिझेलवरील कर ६ रुपयांनी कमी केला होता. २३ महिन्यांनतर आता पुन्हा हे इंधन स्वस्त झाले आहे.छत्रपती संभाजीनगरमध्ये गुरुवारी पेट्रोलचे दर प्रतिलिटर १०७.२० रुपये तर डिझेलचा दर प्रतिलिटर ९३.६८ रुपये होता. शुक्रवारपासून दोन्ही इंधनात प्रत्येक दोन रुपये कपात झाल्यामुळे पेट्रोलचा नवा दर १०५.२० रुपये तर डिझेल ९१.६८ रुपये प्रतिलिटर होऊ शकते. यात थोडा फार फरक येऊ शकतो.

## या प्रकल्पातून विदर्भाचा संपूर्ण कायापालट होणार

# सिंदी येथील मल्टी मॉडेल लॉजिस्टिकच्या पायाभरणी प्रसंगी ना.नितीन गडकरी






**सिंदीरेल्वे । प्रतिनिधी**

येथे मागील ४० वर्षांपासून उपेक्षित शेतजमिनीवर उभारण्यात येणारा हा प्रकल्प वर्धा जिल्ह्याचे भाग्य उजळणाराच नव्हे तर संपूर्ण विदर्भाचा चेहरा मोहरा बदलणार आहे.त्यासाठी परदेशी गुंतवणुकदारांपेक्षा मराठी त्यातही विदर्भातील होतकरु उद्योजकांनी पुढे यावे,असे आवाहन केंद्रीय भूपृष्ठ परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

आज सकाळी अकरा वाजता ना.गडकरी यांचे ड्रायपोर्ट प्रकल्पात आगमन झाले.त्यांनी खा.रामदास तडस,आ.कुणावार,दादाराव केचे,डॉ .पंकज भोयर तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत येथून हैदराबाद कडे कंटेनर्स नेणाऱ्या मालगाडीला हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले.त्यानंतर या प्रकल्पाची पायाभरणी केली. ७६३ कोटी रुपये खर्चून १५० एकरात हा प्रकल्प साकारला जाणार आहे.प्रारंभी,अनेक संस्था संघटनांतर्फे गडकरी यांचे स्वागत करण्यात आले.प्रास्ताविकात प्रकल्पाचे संचालक के. सत्यनाथन यांनी प्रकल्पाची प्राथमिक माहिती सादर केली.खा.तडस, आ.भोयर व आ.समीर कुणावार यांनी मागील एक दशकांपूर्वी आम्ही जनतेला दाखविलेले स्वप्न करण्यासाठी विदर्भ पूत्र नितीन गडकरी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केलेत.आपल्या भाषणात नाम.गडकरी यांनी आज चार घटकांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे,तरच बहुमुखी विकास शक्य आहे असे सांगितले. सात वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी विस्तृत चर्चा करुन सिंदीच्या प्रकल्पासाठी १२००कोटी रुपयांची तरतूद करुन घेतली होती,असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आज सर्वाधिक गरज आहे,युवक,नारी शक्ती,युवा उद्योजक आणि शेतकरी बांधवांची दशा पालटणे.या प्रकल्पातून आपण विश्वाच्या कानाकोपऱ्यात आपले उत्पादन पोहचवू शकतो.त्यात वेळेची,पैशांची,परिश्रमांची बचत होईल,याकडे लक्ष दिल्यास समृध्दी येईल,असे त्यांनी सोदाहरण समजावून दिले.महाराष्ट्रातील हा तिसरा प्रकल्प आहे. नाशिक व जालना येथील प्रकल्प मध्य महाराष्ट्र आणि प.महाराष्ट्रासाठी आहेत.परंतु,सिंदीरेल्वे येथील हा प्रकल्प वर्धा किंवा नागपूर करिता नव्हे तर संपूर्ण विदर्भाच्या विकासाची किल्ली आहे,याचे भान ठेवा.येत्या दोन दशकांत या नगरीचा कायापालट अटळ आहे,अशी अपेक्षा नाम.गडकरी यांनी व्यक्त केली.त्यांनी या प्रकल्पाच्या उभारणीसाठी अहोरात्र झटणाऱ्या रेल्वेच्या,महसूल विभागाचे, जिल्हाधिकारी कर्डिले, लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांचे आभार मानून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्यात.उपस्थितांचे आभार संचालक वाघ यांनी मानले. कार्यक्रमाला पंचक्रोशीतील हजारो शेतकरी व युवक-युवती यांनी हजेरी लावली होती.

# पंतप्रधान मोदींनी शेतकऱ्यांना नव्हे तर धनाढ्यांना कर्जमाफी दिली ;राहुल गांधींचा केंद्रावर घणाघात



**नाशिक (वृत्तसंस्था)-**राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा अंतिम टप्प्यात महाराष्ट्रात दाखल झाली आहे. आज राहुल नाशिकमध्ये रोड शो करणार आहेत. शेतकरी मेळाव्यात बोलताना रामराम मंडळी म्हणत राहुल गांधींची मराठीतून भाषणाला सुरूवात, देशात महागाई, बेरोजगारी, आणि भागिदारी वाढली आहे, असे म्हणत भाजप सरकारवर हल्लाबोल केला आहे. दरम्यान राहुल गांधी नाशिकच्या शेतकरी मेळाव्यात बोलत असताना त्यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. १० वर्षांत नरेंद्र मोदी सरकारने काय केले असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे.राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, अरबपती लोकांचे कर्ज माफ करण्यात आले, पण शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी झाली नाही, आमच्या सरकार असताना ७० हजार कोटींची कर्जमाफी केली. आम्ही एक वेळा तुमचे कर्ज माफ केले त्यांच्या २४ पटीने २० ते २५ लोकांचे कर्ज माफ केले, ते २० ते २५ लोक आहेत त्यांच्याकडे देशातील ७० करोड लोकांइतके पैसे त्यांच्याकडे आहे.राहुल गांधी म्हणाले की, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी महागाई यावर मोदी सरकार का बोलत नाही, कांद्यांच्या भावावर मोदी सरकारकडून काहीच का बोलले जात नाही, असा सवाल राहुल गांधींनी उपस्थित केला आहे.नाना पटोले म्हणाले की, कांदा खाल्ला नाही तर काही फरक पडत नाही, असे म्हणणाऱ्या भाजपचा कार्यक्रमच वाजवून टाकायचा, शेतकरीविरोधी पक्षाला आपण राजकारणातून संपवले पाहिजे. काही मित्राचा पैसा माफ करायचा आणि शेतकऱ्यांची कर्ज माफी करायची नाही, अश्या भाजपच्या सरकारचा जसा खोक्याचे मुख्यमंत्री करेक्ट कार्यक्रम करायचा म्हणतात तसा आपण करेक्ट कार्यक्रम करु. शेतकऱ्यांचा आवाज कमी आहे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्यावर अन्याय करतात, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.नाशिक हा महात्मा गांधी आणि नेहरुंचे स्वागत करणारा जिल्हा आहे. कांदा, द्राक्षाचे उत्पादन करताना घाम गाळतो पण सत्ता ज्यांच्या हाती त्यांना शेती आणि शेतकऱ्यांची चिंता नाही. दिल्लीत कांदा प्रश्नावर चर्चा होणार म्हणून मी थेट चांदवडमधून दिल्लीत गेलो होतो, तेव्हा किंमतीवर त्यांनी चिंता व्यक्त केली होती, असे शरद पवार म्हणाले.केंद्रात काम करत असताना विरोधकांनी कांद्याच्या माळा घातल्या. तेव्हा मी सांगितलं की तुम्ही कोणत्याही माळा घाला. पण शेतकऱ्यांना चांगला भाव मिळाला पाहिजे. मी शेतकरी पत्नीला भेटलो. पतीने आत्महत्या केली होती. कर्ज फेडायला उशीर झाला म्हणून बँकेने नोटीस पाठवली होती. तेव्हा मी मनमोहन सिंग यांच्याशी चर्चा करुन आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफी करण्याचा विचार केला. आजच्या स्थितीत प्रत्येक शेतकरी संकटात आहे. कष्टकरी शेतकऱ्यांच्या विरोधातील हे सरकार आहे.देशांमध्ये मोदींसाठी अमित शहा यांच्या सभेसाठी ज्या प्रकारे भाड्याने लोकांना आणले जाते. तसे या भारत जोडो यात्रेमध्ये भारत न्याय यात्रेमध्ये जाण्यासाठी सभेसाठी भाड्याने लोक आणले नाहीत. लोक स्वतःहून येतात. लोक स्वतःहून चालताहेत. लोक स्वतःहून आपल्या विचार मांडतात आणि हेच आपल्या देशामध्ये परिवर्तन असल्याचे ते म्हणाले. गद्दार आमदार आणि खासदाराला ५०- ५० कोटी रुपये भाव मिळतो. पण कांद्याला भाव मिळत नसल्याची टीका संजय राऊत यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर केली आहे.राहुल गांधी हे आपल्या सगळ्यांचे नेते आहेत. संपूर्ण देशामध्ये भारत जोडो न्याय यात्रा घेऊन ते महाराष्ट्रामध्ये पोहोचलेले आहेत. मी स्वतः त्यांच्याबरोबर या यात्रेत कश्मीरमध्ये चाललो आहे. हा नेता देश जोडण्यासाठी माणसांची मन जोडण्यासाठी या देशांमध्ये चालतो आहे, असे गौरद्वगार राऊतांनी काढले आहे.संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, मला यावेळी इंदिरा गांधी आठवंत आहेत. इंदिरा गांधी जेव्हा देशांमध्ये राजकारण करत होत्या तेव्हा एक घोषणा आम्ही सगळेच देत होतो इंदिरा गांधी आई है नही रोशनी लाही है’ आज तीच नवी रोशनी घेऊन, नवा प्रकाश घेऊन या देशात आणि महाराष्ट्रामध्ये राहुल गांधी आलेले आहेत. आपण त्यांचे स्वागत केले पाहिजे. राहुल गांधी हजारो किलोमीटर या देशांमध्ये चालतायेत. लोकांना भेटताहेत. लोकांशी चर्चा करत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

# पुलगावात ट्रेलर व कार अपघात ;चार जखमी



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील वर्धा मार्गावर रामटेक ले आऊट,सिहोटा पेट्रोल पंपसमोर दि.१३ रात्री ला रात्री २ वाजताच्या दरम्यान ट्रेलर व कार यांची आमनेसामने टक्कर होऊन झालेल्या अपघातामध्ये ४ व्यक्ती जखमी झाल्याचे कळते.
वर्धेकडून येणारा ट्रेलर क्रमांक एम. एच.४६ बी बी व वर्धेकडे जाणारी कार क्रमांक एम.एच.३२ सी ५६२० या दोन गाडी ची समोरासमोर टक्कर झाली.दोन वाहनांचा हा अपघात झाला तेव्हा टेलर वर्धा कडून येत होता कार पुलगाव कडून वर्धा कडे जात होती.दोन्ही वाहने एकमेकांवर आदळली.अपघात झाल्यानंतर अपघातातील जखमी पुलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. प्राथमिक उपचारा नंतर जखमींना सावंगी येथील वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातांनंतर टेलर चा चालक पसार झाला.अशी माहिती आहे.

## ३० कोटी रुपयातून ऐतिहासीक रामाळा तलाव होणार पुनरज्जीवित

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांना यश,अमृत २.० योजनेंतर्गत निधी मंजूर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक रामाळा तलावाच्या सुंदरतेला प्रदूषणाचे ग्रहण लागले होते. त्यामुळे या तलावाचे संवर्धन करण्यात यावे अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली होती. याची दखल मुख्यमंत्री यांनी घेतली असून सदर कामाकरिता अमृत २.० योजनेअंतर्गत ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे आता ३० कोटी रुपयातून ऐतिहासीक रामाळा तलाव पुनरज्जीवित होणार आहे.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नातून चंद्रपूर मतदार संघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध केल्या जात आहे. नुकतेच आमदार किशोर जोरगेवार व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते १५० कोटी रुपयांच्या १९२ विकासकामांचे भुमिपूजन करण्यात आले आहे. तर मतदार संघाच्या सर्वसमावेशक विकासासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. चंद्रपूर शहराच्या मध्यभागी असलेल्या रामाळा तलावाचे संवर्धन करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी ही आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती. सदर मागणीचा त्यांच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेर त्यांच्या मागणीला यश आले आहे. नगर विकास विभागाच्या वतीने सदर विकासकामासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.रामाळा तलाव प्रदूषणमुक्त करून सौंदर्यीकरण करण्याचा प्रकल्प आता अमृत २.० योजनेंतर्गत राबविला जाणार आहे. या प्रकल्पात मलनिस्सारण प्रकल्प, सौंदर्यीकरण, रिटेलिंग वॉल, संरक्षण भिंत, जलीय तण काढणी यंत्रणा यासह इतर सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे या तलावाचे संवर्धन होणार असून यातून शहराच्या पर्यटनात, रोजगारात वाढ होणार असून सौंदर्यात भर पडणार आहे.रामाळा तलाव हा चंद्रपूर शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेवा आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या तलावाकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे तलाव प्रदूषित झाला होता आणि त्याचे सौंदर्य नष्ट होत होते. या तलावाचे संवर्धन करण्यासाठी आपण सतत प्रयत्न करत होतो. आता अमृत २.० योजनेंतर्गत यासाठी ३० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यातून रामाळा तलाव पुन्हा एकदा चंद्रपूर शहराचे सौंदर्य वाढवणारा ठरेल असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.रामाळा तलावाच्या संवर्धनासासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल रामाळा तलाव संरक्षण समीतिच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी भेट घेत त्यांचे आभार मानले आहे.यावेळी डॉ. सुशील मुंधडा, जुगल सोमानी, सिए. दामोदर सारडा, मनोज जुनोनकर, मुंकुद गांधी, सुधिर बजाज, उमेश चांडक, ओमप्रकाश सारडा, श्याम धोपटे, राजु नागरकर, सोनी, मदन पांडिया, विलास वानखेडे, माखीजा, इंगोले, रमेश बोथरा, श्रीचंद हासानी आदींची उपस्थिती होती.यावेळी रामाळा तलाव संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी रामाळा तलावाच्या संवर्धनाबाबत आमदार किशोर जोरगेवार यांच्याशी चर्चा केली. सदर तलाव हा चंद्रपूरच्या सौंदर्यात भर घालणारा आहे. मात्र अनेक नाल्यांचे पाणी तलावत येत असल्याने तलाव दुषित झाला आहे. यावरही उपाययोजना केल्या जाणार आहे. आपण या तलावाच्या संवर्धनासाठी प्रयत्न करत आहात. मंजूर करण्यात आलेल्या ३० कोटी रुपयातून या तलावाला पुनरुज्जीवन मिळणार आहे. असा विश्वासही यावेळी रामाळा तलाव संरक्षण समीतिच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.


# सावधान ग्राहका,थांबव स्वत:ची फसवणूक!

**जो जन्माला आला तो झाला ग्राहकच! गुंतवणूकदार हासुद्धा ग्राहक आहे. त्याचा हक्कासाठी न्यायालयीन आव्हानात्मक लढा सुरू आहे. ग्राहकांना हक्काची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्काबाबत सक्षम व्हावा, याकरिता विविध ग्राहक संघटना लोकांना जागरूक करीत आहेत. या सर्वांसाठी १५ मार्च हा दिवस खुप महत्त्वाचा आहे. हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आपल्या अधिकारांविषयी ग्राहकांना जागृती प्रदान करणारा – श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख... संपादक.**

१५ मार्च हा दिवस संपूर्ण जगात जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा होत असतो. ग्राहकांना सेवा पुरवताना होणार्या हलगर्जीपणामुळे सन १९६० साली अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये ग्राहकांच्या प्रश्नांचा निचरा करण्यास एक व्यासपीठ तयार करण्यात आले. त्यासाठी जागतिक स्तरांवर पाठपुरावेही करण्यात आले. त्याला युनेस्कोनेही मान्यता दिली. त्यानुसारच दरवर्षी १५ मार्चला हा दिवस विश्वभरात साजरा केला जातो. ग्राहकाला अर्थव्यवस्थेचा राजा असे संबोधले जात असले, तरी त्याला मात्र बाजारपेठेत सतत अडवले, नाडवले अन् फसवलेही जातच असते. बिच्चाऱ्याची अपेक्षा तरी काय असते हो? आपण खरेदी करत असलेली वस्तू योग्य दर्जाची, योग्य गुणवत्तेची व वाजवी किमतीची असावी, एवढीच त्याची किमान अपेक्षा असते. पण त्याच्या नशिबी मात्र सतत अपेक्षाभंग आणि मनस्तापच! ग्राहकांचे होणारे शोषण थांबवून त्याच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी दि.२६ डिसेंबर १९८६ या दिवसापासून भारत सरकारने 'ग्राहक संरक्षण कायदा' अंमलात आणला. परंतु केवळ कायदा करून त्यामागील उद्दिष्ट साध्य होत नसते. हा कायदाही त्याला अपवाद नाही. कायदा अस्तित्वात येऊन ३६ वर्षे झालीत, पण थांबले का ग्राहकांचे शोषण? थांबली का त्यांची फसवणूक? कायद्याचा धाक, दरारा निर्माण व्हायला हवा असेल, तर तो ज्या घटकांसाठी केलेला आहे, तो घटक- ग्राहक आधी जागृत असायला हवा. कायद्याचे शस्त्र त्याला पेलता यायला हवे. अन्यथा निरक्षरांपुढे शेकडो उत्तमोत्तम ग्रंथ ठेवण्यासारखाच तो प्रकार होईल.

बाजारपेठेत दूध किंवा शीतपेय एमआरपीपेक्षा अधिक किमतीने घ्यावे लागते. भाजीवाला तराजूत वजनाऐवजी दगड ठेवतो. दुधात भेसळ होते. टॅक्सीवाल्यांची लुबाडणूक आपण निमूट सहन करतो. बिल्डर, फायनान्स कंपन्या, प्रवासी कंपन्या, वस्तूंचे उत्पादक आपल्याला फसवताहेत, हे सगळे का? कारण एकच, अजूनही आपल्यातील शोषणाविरुद्ध लढणारा खरा ग्राहक बाहेर येत नाही. ग्राहकांच्या हितसंबंधाचे अनुचित प्रथांपासून संरक्षण करणे हे आज ग्राहक चळवळीपुढील मोठे आव्हान आहे. त्यासाठी करावी लागणारी ग्राहक जागृती, वेळेप्रसंगी द्यावे लागणारे न्यायालयीन लढे हे सगळेच आव्हानात्मक आहे. कधी कधी तर ही लढाई असते एकट्याची. त्यासाठी वेळप्रसंगी ग्राहक संघटनांचीही मदत घ्यावी लागते, तर कधी ग्राहक संघटना व्यापक ग्राहकहीत लक्षात घेऊन प्रातिनिधिक लढे लढतात. परंतु त्यासाठी समाजातील प्रत्येक ग्राहकाचे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे. त्याकरिता गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती आणि चिकाटीची.

भारतासारख्या विकसनशील देशात खर्या अर्थाने ग्राहक संरक्षण व्हायचे असेल तर ग्राहक प्रशिक्षण, ग्राहक प्रबोधन व ग्राहक जागृती होणे अत्यावश्यक आहे. अनेकविध समस्यांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या ग्राहकांचे प्रश्न अनंत आहेत. कामे ठेकेदाराला सुपूर्द करून प्रश्न सुटत नसतात. संप, बंद, मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको यासारख्या आंदोलनानेही प्रश्नांची स्थायी स्वरूपाची उत्तरे मिळत नाहीत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या आधारे काही प्रश्न सोडविता येतीलही, पण त्यालाही मर्यादा आहेतच. म्हणून आपले प्रश्न सोडविण्यास स्वत:च पुढाकार घ्यावा लागतो. स्वत:च स्वत:ची शक्ती निर्माण करावी लागते अन् वाढवावीही लागते. त्याचसाठी हवे असते प्रशिक्षण, प्रबोधन व जागृती. शोषणमुक्तीचा तोच मूलाधार! ग्राहक चेतनेतून अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवता येईल आणि हेच कार्य ग्राहक पंचायत ही स्वायत्त संस्था करीत आहे. ग्राहक एवं राजा मानणारी ग्राहक पंचायत ही विचाराधिष्ठित संघटना आहे. आज अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत आहे.



**श्री कृष्णकुमार आनंदी- गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु.पो.ता.जि.गडचिरोली**
**दूरभाष- ७७७५०४१०८६.**

सेल, एकावर एक फ्री, लॉटरी, कन्सेशन, बक्षीस, आदींच्या रूपाने नको त्या वस्तूंची अडगळ घरात वाढत आहे. भेसळयुक्त दूध, अन्न आणि औषधेसुद्धा पोटात जावून व्यक्तीसह समाजस्वास्थ्य बिघडत आहे. म्हणूनच असे वाटते की, ग्राहकराजा गुलाम होऊन आज बाजारात उभा आहे. हे चित्र बदलून त्याला खर्या अर्थाने राज्याभिषेक करायचे व्रत स्वीकारले. शोषणमुक्तीसाठी पुढाकार घेऊन ग्राहक संरक्षण कायदा करण्यास शासनाला भाग पाडले. या कायद्याने त्रिसदस्यीय न्यायासन अभिप्रेत आहे. त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हे न्यायासनाचे अध्यक्ष व उर्वरित दोन व्यक्तींपैकी एक स्त्री, अर्थ, कायदा, प्रशासन, व्यापार या क्षेत्रातील तज्ज्ञ असाव्यात, अशी तरतूद आहे.

या १५ मार्च आंतरराष्ट्रीय ग्राहक दिनाचे वेगळेच महत्त्व आहे. १५ मार्च १९६२ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकन संसदेपुढे केलेल्या भाषणात तेथील ग्राहकांना त्यांचे- सुरक्षितता, माहिती, निवड आणि प्रतिनिधित्व हे चार हक्क प्रदान केले. त्यानंतरच्या कालावधीत ग्राहक संस्थांच्या जागतिक संघटनेने संयुक्त राष्ट्रसंघाशी चर्चा करून त्यांचा पाठपुरावा केला. त्यांत मूलभूत गरजा पुरविण्याचा हक्क, तक्रार निवारण्याचा हक्क, ग्राहक शिक्षणाचा हक्क आणि स्वच्छ पर्यावरणाचा हक्क, या आणखी चार ग्राहक हक्कांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. अशाप्रकारे हे आठ ग्राहक हक्क आज जगभर मान्य झाले आहेत.ग्राहकांना गृहीत धरू नका, तो आहे म्हणून तुमचा व्यवसाय आहे. सेवा पुरवठादार कंपन्यांकडे वापरणाऱ्या ग्राहकांची विविध माहिती प्रचंड प्रमाणात जमा होते. ग्राहकांची खाजगी माहिती उघड करू नये. त्याचे बंधन कंपन्यांवर असावे. अवैध व्यावसायिकांवर कारवाई करावी. ग्राहक संरक्षण सुधारणा कायदा २०१९मध्ये आला. त्यात ग्राहक हक्काच्या अनेक तरतुदी आहेत. जाहिरातीत खोटे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे एफडीएला अधिकार आहेत. जाहिरातीतील दावे प्रमाणित करण्याची कंपन्यांना आवश्यकता आहे. नमूद केलेली सेवा कंपन्यांना द्यावीच लागेल. गोडाऊनमध्ये होणाऱ्या अवैध व्यवसायावर कारवाई करण्याची गरज आहे. नवीन सुधारित कायद्याची अंमलबजावणी व्हावी. केंद्राने २०१९मध्ये ग्राहक संरक्षण कायद्यात सुधारणा केली. पण त्याचे नियम तयार नाहीत. तातडीने अंमलबजावणी व्हावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्तीत राजकीय हस्तक्षेप नको. ग्राहकांना हक्काची जाणीव होऊन लोकशाही दिनाच्या तक्रारी वाढाव्यात. ग्राहकांच्या हक्कासाठी केंद्रात ग्राहक संरक्षण आणि अन्न पुरवठा मंत्रालय वेगवेगळे करावयास हवे. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कार्यालय उघडावे. राज्यात स्वतंत्र ग्राहक संरक्षण मंत्रालय स्थापन करावे. प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उघडून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची त्यात नेमणूक करावी आणि ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीची जबाबदारी त्यांच्याकडे द्यावी. त्यामुळे ग्राहकांशी संबंधित तक्रारींना तातडीने न्याय मिळेल. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे ग्राहकांना नियमाप्रमाणे ९० दिवसांपर्यंतही न्याय मिळत नाही. निकाल लागला तरी मात्र अंमलबजावणी काही होत नाही, हा एक जटील प्रश्न आहे!आपण ग्राहक म्हणून वावरताना खुपदा प्राप्त अधिकारांची आणि हक्कांची पायमल्ली होते. अशावेळी ठामपणे, चिकाटीने अधिकारांची अंमलबजावणी करून घेण्याची गरज आहे. डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढत आहे. मात्र या डिजिटल सेवा नीट समजून घेण्याची, त्यांचा वापर योग्यप्रकारे करण्याची आणि सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना हे दाखवून देण्याची खरी हीच वेळ आहे!

!! विश्व ग्राहक हक्कदिन सप्ताहनिमित्त समस्त बंधुभगिनींना सचेतनात्मक हार्दिक शुभेच्छा !!

# आदिवासी टायगर सेनाच्या युवा जिल्हा उपाध्यक्षपदी जयदेव मडावी यांची नियुक्ती



**पोंभुर्णा । प्रतिनिधी**

आदिवासी टायगर सेनेचे विदर्भ अध्यक्ष संतोष कुडमेथे यांनी नुकतीच जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली आहे.आदिवासी टायगर सेना चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्षपदी जयदेव मडावी यांची निवड करण्यात आली आहे.

संतोष कुडमेथे यांचे मार्गदर्शनाखाली ते अनेक वर्षापासून ते संघटनेचे काम करत आहे. महाराष्ट्र आदिवासी टायगर सेनेचे कार्याध्यक्ष राजु तोडसाम यांचे जनसामान्यांच्या हिताचे निर्णय, कष्टकरी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय, यांना प्रेरीत होऊन ही जिम्मेदारी स्विकारुन संघटनेसाठी एक निष्ठेने काम करत राहणार असे जयदेव मडावी यांनी व्यक्त केले.आदिवासी टायगर सेना युवा जिल्हा उपाध्यक्षपदी जयदेव मडावी यांची नियुक्ती झाल्याची माहिती कळताच चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी युवकांकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# उपसरपंच ग्राम पंचायत जवराबोडी अमोल सावसाकडे यांच्यासह ज्येष्ठ नेते कमलाकर ठाकरे यांचा भाजपात प्रवेश

**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या प्रमुख उपस्थितीत चिमूर येथील निवासस्थानी तालुक्यातील काँग्रेस नेते तथा उपसरपंच ग्राम पंचायत जवराबोडी अमोल सावसाकडे यांच्यासह ज्येष्ठ नेते कमलाकर ठाकरे यांनी आमदार भांगडीया यांच्या कार्यक्षम, कणखर, कार्यकुशल नेतृत्वावर व त्यांच्या विकासकार्यावर, कार्यकर्तृत्वावर तसेच विकसनशील ध्येयधोरणांवर प्रभावित होऊन भाजपात पक्षप्रवेश केला.

यावेळी आमदार भांगडीया यांनी त्यांच्या गळ्यात भाजपाचा दुपट्टा टाकून पक्षात सहर्ष स्वागत केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या पक्षप्रवेशाने शंकरपूर जी. प. क्षेत्रात भाजपाचे वर्चस्व वाढत असल्याचे दिसून येत आहे.या पक्ष प्रवेशाप्रसंगी प्रामुख्याने भाजपा तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजपा ज्येष्ठ नेते भिमराव ठावरी, भाजपा ज्येष्ठ नेते घनश्याम डुकरे, भाजपा ज्येष्ठ नेते विलास डांगे, भाजपा ज्येष्ठ नेते गिरिष भोपे, सं.गां.नि.अ.यो. समिती चिमूर अध्यक्ष संजय नवघडे, माजी भाजयुमो तालुकाध्यक्ष किशोर मुंगले, भाजयुमो चिमूर शहराध्यक्ष बंटी वनकर, भाजपा युवा नेते प्रशांत डवले, भाजपा भिसी – आंबोली जि. प. सर्कल प्रमुख निलेश गभणे, हर्षल डुकरे व अन्य भाजपा पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.



# क्रीडा क्षेत्रातून भविष्यातील संधी मिळवा-आमदार सुधाकर अडबाले

## राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत (मुले) भुसावळ संघाचा विजय

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

हॉकी व विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन प्राविण्य प्राप्त केल्यास शैक्षणिक गुणवत्तेसह नोकरीमध्ये देखील प्राधान्य मिळते. यामुळे क्रीडा स्पर्धेमध्ये नैपुण्य मिळवावे, असे आवाहन आमदार सुधाकर अडबाले यांनी नुकतेच चंद्रपूर येथे आयोजित राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धेच्या (मुले) समारोपीय कार्यक्रमात बोलताना केले.



हॉकी प्रमोटर असोसिएशन चंद्रपूर व डेव्हलपमेंन्ड रिसर्च एज्युकेशन सोसायटी (ड्रिम) चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने 'आमदार चषक' राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धा (मुले) लोकमान्य टिळक हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा स्टेडीयमच्या बाजूला चंद्रपूर येथे पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून मुलांचे संघ सहभागी झाले होते.मुलांच्या गटात भुसावळ आणि अमरावती संघात अंतिम सामना रंगला. अतिशय चुरशीच्या सामन्यात भुसावळ संघाने अमरावती संघाचा ७-४ ने पराभव केला. तर तिसऱ्यास्थानी चंद्रपूर संघाने बाजी मारली. मुलांच्या गटात प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या संघाला ट्राफी, रोख आणि मेडल देऊन आमदार सुधाकर अडबाले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बेस्ट स्कोरर, बेस्ट किपर, बेस्ट फॉरवर्ड, बेस्ट डिपेंडर, बेस्ट प्लेअर ऑफ फायनल मॅच, बेस्ट प्लेअर ऑफ द टुर्नामेंट म्हणून खेळाडूंना गौरविण्यात आले.आमदार अडबाले म्हणाले, क्रीडा स्पर्धा केवळ मनोरंजनासाठी नाहीत तर त्यातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळते. शिस्त, नेतृत्वगुण आणि संघभावना यांसारख्या महत्त्वपूर्ण गुणांचा विकासही या स्पर्धांमुळे होतो.यावेळी सुरेंद्र अडबाले, अरविंद दिक्षीत, प्रा. रवी झाडे, दिनकर अडबाले, सचिन मोहीतकर, प्रेम गावंडे, अभिजीत दुर्गे, निलेश शेंडे, रुपेशसिंह चौव्हाण, प्रभाकर टोंगर, संध्या टोगर, अमोल सदभैय्ये, पंकज सदभैय्ये, आकाश इंगळे, लोकेश मोहुर्ले, दिनेश सावसागडे, सिद्धार्थ सूर्यवंशी, शुभम पुणेकर, शुभम साखरे, भारत विरुटकर, अपूर्व कुळसंगे, सोनाली गावंडे, आईशा खान, प्रियंका मंडळ, श्रुती भारती, निधी झाडे, समृद्धी गेडाम, शर्वरी लाभणे, करिष्मा राजपूत, दिक्षा चुनारकर आदींची उपस्थिती होती.

# सखुबाई वाकचौरे यांना नारीशक्तीचा सन्मान

**अकोले । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वतीने कळस बू येथील विडी कामगार व कृषी तील कार्या बद्दल सौ. सखुबाई पुंजा वाकचौरे यांना नारी-शक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने नारी शक्ती सन्मान सोहळा सरला बेटाचे मठाधीपती प.पु. रामगिरी महाराज व आदर्श गाव हिवरे बाजार चे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे हे होते. शिवव्याख्याते प्रदीप कदम, विभागीयध्यक्ष दशरथ चव्हाण, प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, आनंद दिघे इंग्लिश स्कुल चे सचिव अनिल राहणे उपस्थित होते.सौ. सखुबाई पुंजा वाकचौरे ह्या कळस बू येथील असून विडी कामगार चळवळ व आंदोलनाच्या माध्यमातून गरिब, निराधार, विधवा महिलांच्या सबलीकरणाचे विशेष कार्य केले आहे. विडी कामगार यांचे हक्कासाठी रस्ता रोको, मोर्चा असे अनेक सविनय व कायदेशीर मार्गाने लढा दिला. वेतन वाढ, पगारी रजा, पेन्शन, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती यासारखे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी आंदोलने केली यात अनेक




वेळा सात सात दिवस तुरुंगवास येरवडा, विसापूर येथे भोगावा लागला.कळस गावामध्ये एक विडी कारखाना असल्याने महिलांना काम मिळत नसे म्हणून पाच किलोमीटर पायी जाऊन विड्या बांधण्याचे काम केले. या महिलांसाठी दुसरा कारखाना गावात आणला. स्वतः या कारखान्याच्या इमारतीच्या भिंती सारून लोक वर्गणी काढून इमारत बांधली या महिलांची वणवण थांबवली. अनेक मुली, महिला यांना विडी बांधण्याचे शिकविले, अनेक महिलांचे प्रपंच उभे राहिले या महिलांना बचतीचे महत्त्व पटवून दिले. आदिवासी ठाकर समाजाचा वाटेकरी यांला घरकुल साठी स्वतःची जागा घरासाठी जागा बक्षीसपत्र करून दिली.सौ. सखुबाई वाकचौरे यांनी विडी बांधण्याचे काम बंद केल्यानंतर आपले कोरडवाहू शेती चे बागायती शेतीत रूपांतर करून गोपालन व दुग्ध व्यवसाय सुरु केला. जिल्हा परिषद नगर च्या वतीने कृषी अन पशुपालन यातील योगदाना बद्दल प्रगतशील शेतकरी पुरस्कार, महाराष्ट्र शासन व महिला बालकल्याण विभाग च्या वतीने महिला सबलीकरण च्या कार्याबद्दल अहिल्यादेवी होळकर स्मृती पुरस्कार मिळाले आहेत.

# केंद्रात कष्टकरी विरोधी सरकार:सत्ता असणाऱ्यांना शेती अन् शेतकऱ्यांची कोणतीही फिकीर नाही-शरद पवार

**नाशिक**–सत्ताधाऱ्यांना शेती व शेतकऱ्याविषयी कोणतीही चिंता नसल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी केंद्रावर निशाणा साधताना केली. ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांना शेती व शेतकरी यांच्याविषयी कोणतीही चिंता नाही. शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. पण मोदी सरकारला त्याची कोणतीही फिकीर नाही, असे ते चांदवडच्या शेतकरी मेळाव्यात बोलताना म्हणालेत.

दरम्यान पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, कांदा निर्यात बंदीमुळे शेतकरी संकटात आला आहे, आमचे सरकार असताना शेतकऱ्यांची कर्ज माफी केली होती. देशात महागाई बेरोजगारी वाढत चालली आहे, असेही पवारांनी म्हटले आहे.नाशिक हा महात्मा गांधी आणि नेहरुंचे स्वागत करणारा जिल्हा आहे. कांदा, द्राक्षाचे उत्पादन करताना घाम गाळतो पण सत्ता ज्यांच्या हाती त्यांना शेती आणि शेतकऱ्यांची चिंता नाही. दिल्लीत कांदा प्रश्नावर चर्चा होणार म्हणून मी थेट चांदवडमधून दिल्लीत गेलो होतो, तेव्हा किंमतीवर त्यांनी चिंता व्यक्त केली होती, असे शरद पवार म्हणाले.केंद्रात काम करत असताना विरोधकांनी कांद्याच्या माळा घातल्या. तेव्हा मी सांगितली की तुम्ही कोणत्याही माळा घाला. पण शेतकऱ्यांना चांगला भाव मिळाला पाहिजे. मी शेतकरी पत्नीला भेटलो. पतीने आत्महत्या केली होती. कर्ज फेडायला उशीर झाला म्हणून बँकेने नोटीस पाठवली होती. तेव्हा मी मनमोहन सिंग यांच्याशी चर्चा करुन आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफी करण्याचा विचार केला. आजच्या स्थितीत प्रत्येक शेतकरी संकटात आहे. कष्टकरी शेतकऱ्यांच्या विरोधातील हे सरकार आहे.नाना पटोले म्हणाले की, कांदा खाल्ला नाही तर काही फरक पडत नाही, असे म्हणणाऱ्या भाजपचा कार्यक्रमच वाजवून टाकायचा, शेतकरीविरोधी पक्षाला आपण राजकारणातून संपवले पाहिजे. काही मित्राचा पैसा माफ करायचा आणि शेतकऱ्यांची कर्ज माफी करायची नाही, अश्या भाजपच्या सरकारचा जसा खोक्याचे मुख्यमंत्री करेक्ट कार्यक्रम करायचा म्हणतात तसा आपण करेक्ट कार्यक्रम करु. शेतकऱ्यांचा आवाज कमी आहे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्यावर अन्याय करतात, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



# नीलेश लंकेंच्या डोक्यात काही लोकांनी खासदारकीची हवा घातली:नीलेश पारनेरपुरता लोकप्रिय-अजित पवार

**पुणे**–नीलेश लंकेने चुकीची भूमिका घेऊ नये, असे मला वाटते. काल माझ्या भेटीला आला होता. त्याच्या डोक्यात काही लोकांनी खासदारकीची हवा घातली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नीलेश लंकेंबद्दल म्हटले आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार म्हणाले की, नीलेश लंके असा पक्ष सोडून जाऊ शकत नाही. त्यांना राजीनामा द्यावा लागेल, असे मी त्यांना मी सांगितले आहे, असेही अजितदादांनी स्पष्ट केले आहे.नीलेश लंकेला पक्षात मी घेतले होते. नीलेशला मनापासून आधार मी दिला होता. नीलेश लंकेला मोठ्या प्रमाणात मी मदत केली. लंकेच्या डोक्यात काहींनी खासदारकीची हवा घातली आहे. पण वास्तविक तसे नाही. नीलेश लंके पारनेरपुरतेच काम करू शकतो. बाकीच्या मतदारसंघात तो समजतो तेवढे सोपे नाही. मी सांगायचे काम केले, असे अजित पवारांनी म्हटले आहे.नीलेश लंके लिखित मी अनुभवलेला कोविड पुस्तक प्रकाशन सोहळा आज होत आहे. दुपारी ४ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यासाठी जाताना लंके म्हणाले की, मी अनुभवलेला कोविड या पुस्तकाचे प्रकाशन आज होत आहे. तर पुस्तक प्रकाशन सोहळ्याला कोणीही मोठी व्यक्ती येऊ शकते. राजकारणात कधी काय होईल हे सांगू शकत नाही, असे सूचक विधान निलेश लंके यांनी केले आहे.राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नीलेश लंके हे आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. नीलेश लंके यांच्या पुस्तकाचे आज पुण्यात प्रकाशन होत आहे. या कार्यक्रमादरम्यान नीलेश लंके राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करतील, अशी माहिती आहे. आज दुपारी चार वाजता लंके यांचा प्रवेश होण्याची शक्यता आहे. लंके शरद पवार गटात परतल्यास अजित पवारांसाठी हा मोठा धक्का असेल.



### संजय खामकर यांना शासनाचा संत रविदास महाराज पुरस्कार प्रदान

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाला सन्मान

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभाग व सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते संजय खामकर यांना मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते राज्यस्तरीय संत रविदास महाराज पुरस्काराने गौरविण्यात आले.

नरिमन पॉइंट मुंबई येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) जमशेदजी बाबा नाट्यगृहात झालेल्या या शासनाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, सामाजिक न्याय विभागचे सचिव सुमन भांगे, समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोडिया, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, लिडकॉमचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये आदी उपस्थित होते.



संजय खामकर गेल्या तीस ते पस्तीस वर्षापासून चर्मकार समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहून समाजाला प्रवाहात आणण्याचे कार्य करत आहे. चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्य करताना समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा नेहमीच पुढाकार राहिला असून, शासनस्तरावर समाजाचे प्रश्न सुटण्यासाठी त्यांचे कार्य सुरु आहे. राज्यातील लाखो समाजबांधवांना त्यांनी संघटित केले असून, गटई कामगारांच्या न्याय हक्कासाठी ते कार्य करत आहे. वधू-वर परिचय मेळावे व रोजगार मेळावा घेवून युवकांना दिशा देण्याचे कार्य ते करत आहे. शहरात संत रविदास महाराज विकास केंद्र उभारण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन शासनाच्या वतीने त्यांना संत रविदास महाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल खामकर यांचे सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे.

> सामाजिक न्याय विभाग व चर्मोद्योग महामंडळ समाज विकासाच्या विविध योजनांचा लाभ समाजाच्या तळागाळातील बांधवांना मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे चर्मकार समाजाच्या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सकारात्मक बैठक पार पडली. चर्मकार विकास संघाच्या मागणीला यश आले असून, देवनार (मुंबई) येथील दोन एकर जागेत जागतिक दर्जाचे लेदर पार्कची घोषणा नुकत्याच अधिवेशात अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी करून समाजाला न्याय दिलेला आहे. -संजय खामकर
> (प्रदेशाध्यक्ष, चर्मकार विकास संघ)

# फिनिक्सने केले महिलांचे अंधकारमय जीवन प्रकाशमय



**अहमदनगर । प्रतिनिधी**

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने जागतिक महिला दिनानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शिबिर घेण्यात आले. या शिबिराला महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून ४८ ज्येष्ठ नागरिक तर २३ महिलांवर मोतीबिंदू व काचबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

नुकतेच शस्त्रक्रिया होऊन ज्येष्ठ नागरिक व महिला शहरात परतले असता फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी त्यांचे स्वागत केले. या ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे नुकतेच महिला दिनानिमित्त नागरदेवळे (ता. नगर) येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. या शिबिराद्वारे के.के. आय बुधराणी पुणे येथे मोतीबिंदू व काचबिंदूच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी जिल्ह्यात फिनिक्स फाऊंडेशनने मोठी चळवळ उभी केली आहे. शिबिराचा १३७० चा टप्पा ओलांडला आहे. या शिबिरात झालेल्या शस्त्रक्रियेतून तब्बल १ लाख २५ हजार शेतकऱ्यांना दृष्टी मिळाली आहे. ३१ वर्षात आत्तापर्यंत सुमारे ३ लाख ११ हजार जणांची मोफत नेत्र शस्त्रक्रिया झाली आहे. दर महिन्याला गरजू रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले जाते. या शिबीराच्या माध्यमातून नेत्रदान व अवयवदानाची देखील जनजागृती सुरु असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी दिली.

# प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ पिंपरी चिंचवडच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका पत्रकार कक्षामध्ये नुकताच जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.यावेळी ज्या कर्तुत्ववान महिलांनी अपारकष्ट करुन कुटुंबाचे संगोपण, पालन पोषण केले, मुलांना उच्च शिक्षण देवुन घडवले, सामजिक क्षेत्रात उत्तम कार्यरत असणाऱ्या कर्तुत्ववान महिलांचा साडी, पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यामधे शांताबाई कांबळे, सुनिता महाडीक, कामना भोसले, चंद्रकला भोसले, शिवानी पाटेकर, दीक्षा चाबुकस्वार आदी कर्तुत्ववान महिलांनी कष्ट करत कुटुंबाची जबाबदारी तसेच मुलांना उत्तम शिक्षण देत आदर्श माता सन्मान मिळवला.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संगणक अधिकारी उज्वला करपे, कार्यकारी अभियंता प्रेरणा शिंकर, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, कार्यकारी अभियंता जहिरा मोमीन डॉ. संगीता वुके यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ पुणे पिंपरी चिंचवडच्या वतीने प्रमुख पदाधिकारी महिला, सहा आयुक्त सुषमा शिंदे, महिला पत्रकार माधुरी कोराड, पत्रकार अर्चना मेंगळे आदी महिला पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. तसेच सर्व स्तरातील महिलांचे स्वागत करुन महीला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रमुख मान्यवरांनी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ शहरअध्यक्षा सौ मंदा बनसोडे, उपाध्यक्षा उषा लोखंडे, सचिव निर्मला जोगदंड यांचाही सन्मान केला. महीला दिनाबद्दल बोलताना महिलांचे कोणत्याही क्षेत्रातील यश सहज नसते, कुटुंब आणि आपले क्षेत्र सांभाळताना महिलांनाही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात उतरावे लागते, स्त्रीचा सन्मान जर कोणाला करता येत नसेल तर करू नये, मात्र अवहेलना करण्याचा कोणालाही अधिकार नाही. या विचाराने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले.मात्र महीला दिनाच्या दिनी महिलांनी त्या महान व्यक्तीचा उल्लेख करण्यास त्या विसरल्या नाहीत, जर ज्योतिबा फुले नसते, तर सावित्री माई घडल्या नसत्या, माता जिजाऊमुळे शिवाजी महाराज घडले, स्त्री सन्मान मिळाला, डॉ. बाबसाहेब अंबेडकर नसते तर संविधानिक हक्कापासून स्त्रिया वंचित राहिल्या असत्या. अशा महान मानवांचे आणि फुले, शाहू आंबेडकर यांच्यासह ज्या महापुरुषानी 'स्त्रीयांच्या उद्धारासाठी झटले त्या सर्व महापुरुषाचे आभार मानन्यात आले. यावेळी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे कौतुक करत सर्व मान्यवरांनी आभार मानले.



# जागा वाटपावरून मविआत मतभेद नाही, १७ तारखेनंतर फार्म्युला जाहीर होईल

**मुंबई । प्रतिनिधी**

निवडणुकीत एका पक्षाला एकच चिन्ह असते पण भारतीय जनता पक्ष दोन चिन्हांवर लढत आहे, एक चिन्ह कमळ आहे तर दुसरे चिन्ह वॉशिंग मशिन आहे. आणखी दोन फ्रंटल आहेत ते म्हणजे ईडी व सीबीआय. भारतीय जनता पक्ष व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची निती व नियत ही समाजात फूट पाडण्याची आहे. भाजपाच्या या नितीविरोधात काँग्रेस पक्ष मात्र भारत जोडो व न्याय यात्रेच्या माध्यमातून समाजाला न्याय देण्याचे काम करत आहे, असे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे मीडिया विभागाचे अध्यक्ष जयराम रमेश यांनी सांगितले.




नंदूरबार येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना जयराम रमेश यांनी भारत जोडो न्याय यात्रेची माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, १४ जानेवारी २०२४ ला मणिपूरमधून भारत जोडो न्याय यात्रा सुरु झाली व आज ५९ व्या दिवशी महाराष्ट्रात प्रवेश केला आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी यांनी भारत जोडो न्याय यात्रा व पांच न्याय याबद्दल जनतेला माहिती दिली. आतापर्यंत तीन न्याय संदर्भात काँग्रेस पक्षांने गॅरंटी दिली आहे. ही गॅरंटी एका व्यक्तीची नाही तर ही पक्षाची गॅरंटी आहे. एमएसपीला कायदेशीर करणे, तरुणांना पाच न्याय देण्यासंदर्भात गॅरंटी दिली तर सामाजिक न्याय संदर्भात जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवण्याची गॅरंटी दिली आहे. धुळ्यात महिला संमेलनात महिला न्याय संदर्भातील गॅरंटी जाहीर केली जाईल तर १७ तारखेला शिवाजी पार्कवरील सभेत इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत कामगार न्यायाच्या गॅरंटीबद्दल घोषणा केली जाईल.प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले की, महाविकास आघाडीच्या जागा वाटपाची चर्चा सुरु आहे, सर्व समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय आहे. जागा वाटपासंदर्भात महाविकास आघाडीची चर्चा असून कोणतेही मतभेद नाहीत. वंचित आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा सुरु आहे व बाळासाहेब थोरात हेही त्यांच्याशी चर्चा करत आहेत. १७ तारखेनंतर मविआचा जागा वाटपाचा फार्म्युला जाहीर केला जाईल.नाना पटोले म्हणाले की, देशाची अवस्था अत्यंत वाईट असून लोकशाही व संविधान संपवून जनतेला महागाई व बेरोजगारीच्या खाईत लोटले आहे. शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्यात आले आहे. देशाला दिशा दाखवण्याचे काम महाराष्ट्राने केले आहे यावेळीही महाराष्ट्रच परिवर्तनाचा संदेश देणार आहे. भाजपा लोकसभेच्या १५० जागाही निवडून येणार नाहीत. भाजपाचा शेवटचा प्रयत्न सुरु आहे. केंद्रातील भाजपा सरकार खाली खेचण्याची भावना जनतेची झालेली आहे. यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, नंदूरबार जिल्हा नेहमीच काँग्रेस पक्षाच्या विचाराचा जिल्हा राहिला आहे. आणि या जिल्ह्यातून काँग्रेसचे उमेदवार नेहमी निवडून आला आहे. भाजपाच्या कार्यपद्धती व विचाराविरुद्ध आहेत. जे या विरोधात आहे त्या सर्वांनी एकत्र यावे ही भूमिका काँग्रेसची आहे. या विचाराचे लोक भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होत आहेत. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान १४ मार्चला चांदवड येथे शेतकरी मेळावा होत असून मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार. शिवसेनेचे खासदार संजय राऊत हे उपस्थित राहणार आहेत.या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे अध्यक्ष जयराम रमेश, प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मंत्री के. सी. पाडवी, -खउउ सचिव बी. एम. संदीप, आ.शिरीष नाईक, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, एससी विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, मीडिया विभागाचे अध्यक्ष विशाल मुत्तेमवार, प्रतिभा शिंदे आदी उपस्थित होते.

# ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांचे योगदान मोलाचे-प्रा.गणेश पोकळे



**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यासाठी मंगळवार दि.१२ मार्च २०२४ रोजी बीड येथील,वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिजम अँड कम्प्युटर सायन्स महाविद्यालयात जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घालत, शहरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा समतोल व्हावा. कामानिमित्त शहराकडे जाणा-या लोकांचा ओढा थांबवण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवून केलेले कार्य मोलाचे आहे असे प्रतिपादन जयंतीच्या कार्यक्रमांमध्ये कै.आण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थाचे सचिव प्रा.गणेश पोकळे यांनी केले. सविस्तर वृत्तांत असा की,बीड येथील,वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिजम अँड कॉम्प्युटर सायन्स या महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रा.गणेश पोकळे बोलत होते.

या कार्यक्रमाला प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाच्या प्रारंभी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले पुढे बोलताना प्रा.पोकळे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या विकासासाठी केलेले कार्य मोलाचे आहे त्यांनी ग्रामीण भागातील शेती हा आर्थिक उत्पन्नाचा मुख्य घटक आहे हे समोर ठेवून अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली शेतीला मुबलक पाणी मिळण्यासाठी नद्यांवर धरणे बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन झाले खऱ्या अर्थाने तेंव्हा पासून शेती विकासाला चालना मिळून ग्रामीण विकासाला गती मिळाली असेही प्रा.गणेश पोकळे म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले तर शेवटी आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.भूषण मठपती यांनी मानले या कार्यक्रमाला प्रा.राजश्री महाजन,प्रा.शिवशंकर पटवारी, प्रा.सुहास गाढवे,महेश नेवडे, प्रवीण उंदरे,दीपक जाधव, सचिन चौरे ,सौ.खोसे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे साधला जिल्ह्यातील सामाजिक न्यायाच्या लाभार्थ्यांशी संवाद

## राळेगण थेरपाळचे नरेश अवचार यांना प्रधानमंत्र्यांशी संवाद साधण्याची संधी !

**अहमदनगर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशभरातील मागासवर्गीय लाभार्थ्यांशी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून दिल्ली येथून संवाद साधला. तत्पूर्वी, प्रातिनिधीक स्वरूपात देशातील ४ लाभार्थ्यांशी थेट संवाद साधत, त्यांना मिळालेल्या केंद्र शासनाच्या योजनेच्या लाभाविषयी प्रधानमंत्र्यांनी माहिती जाणून घेतली. यामध्ये पारनेर तालुक्यातील राळेगण थेरपाळ येथील तरूण नव -उद्योजक नरेश अवचर यांचा समावेश होता. प्रधानमंत्र्यांनी नरेश अवचर यांच्या स्टार्ट-अप विषयी यावेळी माहिती जाणून घेतली. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील वंचित मागासवर्गीय लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात सवलतीचे व्यावसायिक व शैक्षणिक कर्ज, आयुष्यमान कार्ड व सफाई कर्मचाऱ्यांना पीपीई किटचे केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

याप्रसंगी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त डॉ.पंकज जावळे यांच्या सोबत सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या विविध योजनांचे जिल्ह्यातील असंख्य लाभार्थी उपस्थित होते. राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ या तीन राष्ट्रीय महामंडळामार्फत अनुसूचित जाती, इतर मागास वर्ग व सफाई कर्मचाऱ्यांपैकी एक लाख लाभार्थ्यांना सवलतीचे कर्ज , सफाई कामगारांसाठी आयुष्यमान हेल्थ कार्ड व पी.पी.ई. कीटचे आज देशभरात वाटप करण्यात आले. अहमदनगर जिल्ह्यातील असंख्य लाभार्थ्यांना या योजनांच्या लाभांचे आज वितरण करण्यात आले. वंचित घटकांना सवलतीचे अर्थसहाय्य करण्यासाठी तयार करण्यात आलेले पीएम सुरजया राष्ट्रीय पोर्टलचे उद्धघाटन ही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून देशातील ४७० जिल्ह्यातील ३ लाख लाभार्थ्यांशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी संवाद साधतांना म्हणाले की, केंद्र शासनाच्या योजनांच्या माध्यमातून अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी व वंचित वर्गाला विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम करण्यात आले आहे. विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून ७२० कोटी रूपयांचा निधी थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला आहे. वंचितांना देशाच्या विकासात भागीदार करण्यात आले आहे. असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले.प्रधानमंत्र्यांच्या लाभार्थी संवाद व भाषणापूर्वी अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील म्हणाले की, देशातील ३ कोटी महिलांना कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून लखपती करण्याचा केंद्र शासनाचा उद्देश आहे. पीएम सुर्यघर योजनेमुळे येत्या काळात एक कोटी घरांना ३०० युनिट मोफत वीज मिळणार आहे. सर्वसामान्य माणसांना जीवनदान देण्याचे काम आयुष्यमान कार्डच्या माध्यमातून झाले आहे. पीएम स्वनिधी योजनेतून सर्वसामान्य माणसाला स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम झाले आहे.याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सवलतीच्या व्यावसायिक व शैक्षणिक कर्ज लाभाच्या ५ लाभार्थी, आयुष्यमान कार्डचे ९ लाभार्थी व पीपीपी कीटचे १० सफाई कामगार लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व कीटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे यांनी केले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संवाद साधलेले जिल्ह्यातील तरूण नव उद्योजक नरेश साहेबराव अवचर (राळेगण थेरपाळ, ता.पारनेर) यांना राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळाच्या असीम (-डखखच्) - डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल इनोव्हेशन अँड इनक्युबेशन मिशन योजनेत स्टार्ट-अप उद्योजक म्हणून ३० लाखांचे कर्ज मिळाले आहे. या वित्तीय सहाय्यातून त्यांनी जलजीवन ग्रो टेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची स्थापना केली असून या माध्यमातून शेतातील पाणी गळतीपासून संरक्षण देणारे 'रबर टेल' नावाचे उत्पादन तयार केले आहे. रबर टेल उत्पादनास पेटंट ही मिळाले आहे. प्रधानमंत्र्यांनी आज नरेश अवचर यांच्याशी संवाद साधला. यावेळी प्रधानमंत्री म्हणाले की, शेतकरी ते उद्योजक हा आपला प्रवास अविश्वसनीय आहे. इथपर्यंतचा हा प्रवास कसा झाला ? त्यावर नरेश अवचर म्हणाले की, माझे वडिल,आई, भाऊ यासह मी लहानपासून शेतात काम केले आहे. त्या अनुभवातून मला कंपनी स्थापन करण्याची प्रेरणा मिळाली. आपणास केंद्र शासनाच्या कोण-कोणत्या योजनांना लाभ मिळाला आहे. या प्रधानमंत्र्यांच्या प्रश्नांवर श्री.अवचर म्हणाले की, मला आयुष्यमान कार्ड व असीम योजनेचा लाभ मिळाला आहे. आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून आपण शेतकऱ्यांना कशा प्रकारे मदत करता. आपण हे उत्पादन स्वतः तयार केले आहे का ? शेतकऱ्यांना आपण कशा प्रकारे मार्गदर्शन करतात. ? यावर श्री.अवचर म्हणाले की, भारत हा कृषी प्रधान देश आहे. कृषी क्षेत्रासाठी केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेऊन आपली आर्थिक उन्नती करावी. अशा प्रकारे विविध प्रश्नांच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नरेश अवचर यांच्या यशाचा प्रवास जाणून घेतला.

# लोकनेत्या पंकजाताईंच्या उमेदवारीने भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीने बीड लोकसभेसाठी भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची उमेदवारी जाहीर झाली असून आज संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून जल्लोष साजरा केला.

या जल्लोषात प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. सर्जेराव तांदळे, प्रा. देविदास नागरगोजे, नवनाथ शिराळे, चंद्रकांत फड, बालाजी पवार, शांतीनाथ डोरले, डॉ. लक्ष्मण जाधव, अजय सवाई, सुनील मिसाळ, ॲड. संगीता धसे, संध्याताइ राजपूत, प्रीत कुकडेजा, छायाताई मिसाळ, शितलताई राजपूत, लताताई बुंधेले, राजू शहाणे, इरशाद भाई, कृष्णा तिडके, केशव बडे, राजू गायकवाड, राकेश बिराजदार, बाबुराव परळकर, विनायक मुंडे, सुरेश माने, नंदू वनवे, अप्पासाहेब झोडगे, बद्रीनाथ जटाळ, अमर सानप यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संखेने सहभागी झाले होते.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा वसा आणि वारसा घेऊन पंकजाताई व खा. प्रितमताई



यांनी जनसेवेचे काम अविरतपने चालू ठेवले आहे. डॉ प्रितमताई मुंडे यांनी दहा वर्ष सातत्याने जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्नशिल राहून जनसंपर्क कायम ठेवला. बीड रेल्वेचा प्रश्न मार्गी लावला. तर पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना बीड जिल्ह्याच्या विकासात प्रचंड भर टाकली. गाव खेड्यापर्यंत कोठ्यावधी रुपयांचा निधी देऊन विकास गंगोत्रीची अनुभूती दिली. जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलून टाकला. पंकजाताईंनी जिल्हासह राज्यभर लोकांच्या सुखदुखा:त सहभागी होऊन लोकसंपर्काची नाळ कायम ठेवली. मुंडे भगिनींचे राजकीय व सामाजिक जीवनातील सेवेची शिदोरी उद्याच्या विजयासाठी बळ देणारी आहे. आगामी निवडणुकीत पंकजाताईंना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्यासाठी भाजपाचा प्रत्येक कार्यकर्त्यांनी संकल्प केला आहे. उद्याचा विजय भाजपाचाच असेल असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# डॉ.शेख फरीदा यांना विशेषज्ञ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) या पदावर पदोन्नती

## बीड जिल्हा रुग्णालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणुन कार्यरत डॉ शेख फरीदा अ.शकुर यांना विशेषज्ञ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजानिक आरोग्य विभागाने या विषयीचे आदेश १२ मार्च रोजी निर्गमित केले आहे. डॉ शेख फरिदा यांना विशेषज्ञ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) या पदावर सदर पदोन्नती ही महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे. डॉ शेख फरीदा या पदावर नियुक्त होणारी मराठवाड्यातील बहुदा पहिली मुस्लिम महिला डॉक्टर आहे. सन २००० मध्ये गेवराई तालुक्यातील निपाणी जवळका (पी एच सी) येथुन कर्तव्यावर रुजु होऊन नंतर धानोरा, मादळमोही, नेकनुर येथे उत्तमरीत्या कार्य करत



सद्या बीड जिल्हा रुग्णालयात कर्तव्य बजावत आहे. डॉ शेख फरीदा गेल्या २४ वर्षापासून अत्यंत प्रामाणिकपणे शासकीय रुग्णालयात आरोग्य सेवा देत आहेत. विशेष म्हणजे कोरोना काळात डॉ शेख फरीदा यांनी कोरोना रुग्णांचे सिझेरीन डिलिव्हरी व कोरोना मयतांचे पोस्ट मार्टोम ही केलेले आहे. पैश्याच्या अमिषाला बळी न पडता खाजगी रुग्णालयात प्रॅक्टिस न करता शासकीय रुग्णालयातच अविरत रुग्णसेवा करून त्यांनी एक उत्तम उदाहरण निर्माण केले आहे. डॉ शेख फरीदा अ. शकुर बीड नगर पालिकेचे माजी उपाअध्यक्ष शेख शाकेर यांच्या सुविज्ञ व आदर्श पत्नी आहेत. डॉ शेख फरीदा यांच्या सदर पदोन्नतीवर समाजाच्या सर्वस्तरातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## तब्बल ५ कोटी रु.ची विकासकामे होणार

# जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडेंच्या प्रयत्नांनामुळे होणार पेंडगावच्या हनुमान मंदिर व म्हाळस जवळ्याच्या मोहिनीराज मंदिराचा विकास

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या श्री क्षेत्र पेंडगाव येथील हनुमान मंदिर आणि म्हाळस जवळा येथील श्री मोहिनीराज मंदिर देवस्थानच्या वैभवात लवकरच भर पडणार आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. पेंडगाव देवस्थानसाठी १ कोटी रु.तर श्री मोहिनीराज देवस्थानच्या विकास कामांसाठी ४ कोटी रु.चा निधी मंजुर झाला असून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने या संदर्भातील शासन आदेश जाहिर केला आहे. या विकास कामांना मंजुरी दिल्याबद्दल जिल्हाप्रमुख खांडे यांनी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, कृषीमंत्री धनंजय मुंडे, ना.गिरीश महाजन, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे ,खा.प्रितमताई मुंडे यांचे आभार व्यक्त केले आहेत. बीड शहराच्या जवळ असणार्या धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या श्री क्षेत्र पेंडगाव येथील श्री हनुमान मंदिर व म्हाळस जवळा येथील श्री मोहिनीराज या देवस्थानांचे हजारो भाविक बीड जिल्ह्यासह संपुर्ण राज्यभरात आहेत. जागृत व नवसाला पावणारा देव म्हणून पेंडगावच्या हनुमान मंदिराची ख्याती आहे. या देवस्थानसाठी १ कोटी रु.विकास निधी जाहिर झाला असून श्री. मोहिनीराज देवतेचे संपुर्ण देशात केवळ दोनच ठिकाणी मंदिरे आहेत. त्यापैकी एक असलेल्या म्हाळस जवळा येथील मंदिराच्या विकाससाठी ४ कोटी रु.निधी मंजुर झाला आहे.दि.११ मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या या शासन निर्णयात मंदिराच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेक्षिक पर्यटन योजने अतंर्गत सन २०२३-२४ मध्ये या शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांचे बीड विधानससभा मतदारसंघातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या मंदिरांच्या ठिकाणी विकासकामे व्हावीत यासाठी विशेष लक्ष आहे. दोन्ही देवस्थानच्या या विकास कामांना भरभरुन



निधी दिल्याबद्दल जिल्हाप्रमुख खांडे यांनी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, कृषीमंत्री धनंजय मुंडे, ना.गिरीश महाजन, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे,खा.प्रितमताई मुंडे यांचे आभार व्यक्त करत सदरील विकासकामे दर्जेदार पध्दतीने होतील असा विश्वास व्यक्त केला आहे. पेंडगाव येथील श्री हनुमान मंदिर व म्हाळस जवळा येथील श्री मोहिनीराज मंदिर हे अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्रे असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते गेल्या ३० वर्षापासून या ठिकाणी मंदिर ट्रस्टच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित केले जातात मात्र या ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक अडचणीं निर्माण होत होत्या या ठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणात अखंड हरिनाम सप्ताहाचा कार्यक्रम होत असतो या सप्ताह प्रसंगी जिल्हाप्रमुख खांडे यांची उपस्थिती दरवर्षी असते. मंदिर ट्रस्टच्या वतीने जिल्हाप्रमुख खांडे यांच्याकडे पर्यटन विकास अंतर्गत निधी उपलब्ध व्हावा यासाठी सातत्याने मागणी केली जात होती . जिल्हाप्रमुख खांडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून विकास निधी मंजुर करुन आणला आहे.

# मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस अखेर मंजुरी

## ६९७ कोटी रुपयांच्या योजनेचा २४ गावांना लाभ

**मंगळवेढा :** सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासन दरबारी प्रलंबित असलेल्या ६९७ कोटी रुपये खर्चाच्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस अखेर आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिली. ६९७ कोटी रुपयांची ही योजना पूर्ण झाल्यास मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांना लाभ होणार असून १७ हजार १८६ हेक्टर क्षेत्र येणार सिंचनाखाली येणार आहे.स्व. भारत भालके यांनी प्रयत्न केलेल्या या योजनेवर आज आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नाने शिक्कामोर्तब झाले असून या योजनेचा लाभ तालुक्याला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.२००९ च्या लोकसभा निवडणुकीपासून मंगळवेढा तालुक्याच्या राजकीय पटलावर मंगळवेढा उपसा सिंचन योजना गाजत आहे. स्व. भारत भालके यांनी प्रयत्न करून २०१४ ला ४९५ कोटीच्या योजनेस प्रशासकीय मान्यता मिळवून दिली होती. त्यानंतर सत्ता बदल झाल्यानंतर या योजनेचे पुर्नसर्वेक्षण करण्यात आले.यात पाणी आणि गावे कमी करण्यात आली. तत्कालीन खासदार शरद बनसोडे यांनी याबाबत लोकसभेत प्रश्न उपस्थित केला होता. पुन्हा महाविकास आघाडी सरकारच्या काळात पाणी आणि गावे पूर्वत करून या योजनेचे फेरसर्वेक्षण करण्यात आले.दरम्यान, पंढरपूर पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान आवताडे यांना आमदार करा, मी प्रश्न मार्गी लावतो असा शब्द दिला होता. आमदार समाधान आवताडे यांनी पावसाळी अधिवेशनात याबाबत प्रश्न उपस्थित केला.त्यानंतर सर्वे करून प्रस्ताव सादर करण्यात आला. ९ सप्टेंबर २०२३ ला स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रांताधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. आमदार समाधान आवताडे यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा करून या योजनेच्या प्रस्तावावर जानेवारी महिन्यात मुख्यमंत्र्यांची सही घेतली.त्यानंतर मंत्रिमंडळाच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा लागून राहिली होती. दरम्यान, अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार प्रणिती शिंदे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला व नुकताच त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळी ३२ गावाचा दौरा देखील केला.तर २४ गावातील सरपंचांनी अर्थमंत्री अजित पवार यांची मुंबई येथे भेट घेत हा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली. पाणी संघर्ष समितीच्या वतीने पाठकळ व निंबोणी येथे बैठक घेत लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार व कर्नाटकात जाण्याचा इशारा दिल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती.शिवाय लोकसभा निवडणुकीत पाण्यावरून मोठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता असतानाच अखेरीस आज या योजनेला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शब्दाची अडीच वर्षांनंतर आता पूर्तता झाली. निधी उपलब्ध होताच या कामास सुरवात होणार आहे.आमदार समाधान आवताडे यांनी यासाठी पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावल्यामुळे सत्ताधारी पक्षाला निवडणुकीत फायदा होणार आहे. दरम्यान, मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर मंगळवेढ्यात आमदार आवताडे समर्थकांनी जल्लोष साजरा करत पेढे वाटले.यासाठी योजनेसाठी स्व. भारत भालके, आमदार समाधान आवताडे, आमदार प्रणिती शिंदे, माजी खासदार शरद बनसोडे, भगीरथ भालके, अभिजित पाटील, शैला गोडसे, प्रशांत साळे, अनिल सावंत, रामेश्वर मासाळ, दत्तात्रय खडतरे, विविध संघटना व पाणी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी पत्रव्यवहार, आंदोलन, याचिका आदी माध्यमातून प्रयत्न केले.मंगळवेढा उपसा सिंचन योजनेत लक्ष्मी दहिवडी, आंधळगाव, शेलेवाडी, लेंडवे चिंचाळे, खुपसंगी, नंदेश्वर, गोणेवाडी, जुनोनी, खडकी, पाटखळ, मेटकरवाडी, भोसे, रड्डे, सिद्धनकेरी, निंबोणी, जित्ती, खवे, यड्राव, शिरशी, भाळवणी, जालिहाळ, हाजापूर, हिवरगाव, डोंगरगाव या गावांचा समावेश आहे.भीमा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून ९५ किलोमीटरमधून पोहोच कालव्याद्वारे योजनेसाठी आवश्यक २.०४ अब्ज घन फूट(५७.७६४ दलघमी) पाणी उचलून बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे २४ गावातील १७ हजार १८६ हेक्टर दुष्काळी क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

# टायनी एंजल्स प्री- प्रायमरी मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी स्पर्धांचे आयोजन

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड येथील वाडी ( बु ) परिसरातील लक्ष्मीनगर मध्ये असणाऱ्या टायनी एंजल्स प्री- प्रायमरी शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संध्या देवेंद्र जोशी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला संस्थेच्या सदस्या सौ वसुधा भानेगावकर, संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. स्नेहल जोशी, हिंगोली येथील ज्ञानवर्धिनी अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ.सौ. दीपा गिरीश डाफणे, टायनी एंजल्सच्या इंग्रजी ( प्राथमिक) माध्यमाच्या मुख्याध्यापिका नागलक्ष्मी पेरावली, प्राथमिक सेमी इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. संध्या कुलकर्णी, प्री प्रायमरी विभागाच्या मुख्याध्यापिका ललिता वेलूर, वामननगर प्री-प्रायमरी शाखेच्या मुख्याध्यापिका कल्पना बिरादार यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. सौ. दीपा डाफणे यांनी महिला दिनाचे महत्त्व आपल्या भाषणात सांगितले. संस्थेचे अध्यक्षा डॉ संध्या जोशी यांनी महिला दिनानिमित्त सर्व शिक्षिकांचे व उपस्थित महिला पालक वर्गाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. महिलांच्या कठोर परिश्रमाचे व समर्पणाचे त्यांनी कौतुक केले. पालकांनी आपल्या मुलींना मुलाप्रमाणेच वागवून त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले. जगभरातील महिलांचे कर्तृत्व, सामर्थ्य व महत्त्व यांचा सन्मान आंतरराष्ट्रीय महिला दिनी केला जातो असे त्यांनी सांगितले. महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी संगीत खुर्ची, पिकअप द बॉटल या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. संगीत खुर्ची स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक ज्योत्स्ना दामोदर प्रथम क्रमांक, सुनिता साखरकर द्वितीय, मनीषा गोरखवाड तृतीय क्रमांक पटकाविला. पिकअप द बॉटल या स्पर्धेमध्ये महिलांमधून प्रथम क्रमांक येण्याचा मान सुषमा कांबळे, द्वितीय क्रमांक स्मिता बहादुरे, तृतीय क्रमांक सपना वाच्छेवाड यांनी मिळविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्वाती पारवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्री प्रायमरी च्या मुख्याध्यापिका ललिता वेलूर, रोहिणी जोशी, पूजा भुसारे, नेहा पाटील, पूजा भागवत, स्वाती पारवे, सोनाली बरडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .